# प्रकरण तिसरे

## दोन्ही खंडकाव्यातील विचारसौंदर्य आणि भावसौंदर्य

कवी अनिल एक सौंदर्यवादी कवी आहेत म्हणूनच शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध यामध्ये प्रकट होणारे सौंदर्य त्यांच्या अनेक भावकाव्यातून ठिबकताना दिसते पण कवीच्या सौंदर्य ग्रहणशक्तीला विशिष्ट मर्यादांचे कुंपण नाही. आपल्या हृदयीच्या अंधारात लावलेल्या फुलवातीतील सौंदर्य कवीला आवाहन करते.

भग्नमूर्तितच्या पाषाणातले भग्नसौंदर्य पाहून कवीच्या व्यथित वृत्तीचा एक आगळाच अविष्कार घडतो. सुंदरतेचे कवीला आकर्षण आहे हे खरेच पण सौंदर्याचा शोध घेऊन त्याचा आस्वाद घेत राहणे हे कवीला लाभलेले निसर्गदत्त वरदान आहे. आपल्या हृदयात एकरूप झालेला आनंद कवी ज्या एका सुंदर प्रेरणेतून वाचकापर्यंत नेऊन पोहोचवितो त्या वृत्तीही सौंदर्यशालिनी आहेत.

भारतीय संस्कृतीतील परममंगल मूल्यांबद्दल अनिलांना अभिमान आहे. दुसरीकडे ते भौतिक जगातील विज्ञाननिष्ठेलाही जपतात आणि त्या दोहोंचा मेळ आपल्या सामाजिक स्वरूपाच्या कवितेतून घालताना दिसतात. आजच्या या विज्ञानयुगात भारतीय संस्कृतीतील पारंपारिक आणि काही निःसत्व अंगाना धक्का पोहोचणे अपरिहार्य आहे. परंतु त्या संस्कृतीतील "परममंगल आणि उदात्त" मूल्ये उद्ध्वस्त होणार नाहीत यासाठी भारतीय माणसाने जपले पाहिले असा त्यांचा कटाक्ष दिसतो. परंतु आज अज्ञान आणि स्वार्थ यामुळे हे "समाज संस्कृती मंदिर" कवीला भग्न स्थितीत दिसत आहे. हा विचार त्यांनी रामटेक येथील भग्न वामनमूर्तीच्या रूपकातून विशद केला आहे.

अनिलांनी भग्नमूर्तीत सुरुवातीलाच रामटेक आणि तेथील परिसर विविध चित्रांची योजना करून नेत्रगोचर केला आहे.

"भग्नमूर्ती आणि भग्नमंदिर
समोरच आहे तिचे पडके
अवघे चार पाषाणस्तंभ" (भग्नमूर्ति पृ. 1)

या सुरूवातीच्या काव्यपंक्तीतून कवीने "भग्नमूर्ति" असा उद्‌गार काढून आपल्या अंतःकरणातील हळहळच व्यक्त केली आहे. त्यातून कवीची शिल्पाकृतीतून सौंदर्य शोधण्याची आणि त्यातून जीवनाचे स्वरूप न्याहाळण्याची कलाभिज्ञ वृत्तीही दिसून येते.

ते म्हणतात, "मला शिल्पातल्या सौंदर्याची काही विशेष संवेदनाक्षमता आहे. उत्तमशिल्पाचे दर्शन माझ्या अंगावर रोमांच उभे करते. कालिदासाने गौरविलेल्या रामगिरीवर, रामटेक येथे जेव्हा मी त्रिविक्रम वामनाची अतिसुंदर पण छिन्नविछिन्न मूर्ती पाहिली तेव्हा माझ्या भावनांचा कल्लोळ उडाला. सौंदर्य प्रतीती, दुःख, उपहास या भावनांच्या मंथनातूनच नव्या आकांक्षा आणि आशा वर आल्या. संस्कृतीनाशाचे रहस्य किंचितसे कळलेसे वाटले. मूळची स्फूर्ती जरी मूर्तीचा नाश पाहून झालेल्या शोकाची होती. तरी तिचा विकास होत जाऊन दीर्घ काव्य झाले.

(आ.रा देशपांडे "मी का लिहितो" युगवाणी सप्टेंबर 1946 पृ. 47)

याप्रमाणे अनिलांचे शिल्पकलेचे ज्ञान आणि भग्नवामनमूर्तीदर्शन हे घटक काव्यनिर्मितीस कारण होऊन कवी आपल्या समाजजीवनातील उद्‌ध्वस्त स्वरूप शोधून त्याची कारणमीमांसा सांगू लागतो.

"भग्नमूर्ती" कथानकरहित आहे. अनिलांनीच या काव्याची निर्मितीप्रक्रिया सांगितल्यावरून त्याचे स्थूलमानाने वर्णनपर, काव्यमय आणि चिंतनपर असे तीन भाग पडतात. समाजजीवनातील संस्कृती नाशाचे चिंतन करण्यापूर्वी रामटेकच्या परिसरातील आणि देशातील विविध ठिकाणी असणाऱ्या भग्नमूर्तीचे दर्शन घडविले आहे. त्यात भग्नमूतीच्या स्तंभावरील कमलबंध, भग्नवामनमूर्ती आणि त्याच्या पायाखाली नम्रतेने वाकणाऱ्या बळीराजाची मूर्ती, अजिंठयाचे बौध्द विहार, पोपडे उडालेल्या बुध्द समाधीच्या मूर्ती, कैलास मंदिराचे वर्णन, भाजे–कार्ले येथील भग्नमूर्ती, मथुरेच्या प्राणीसंग्रहालयात शीरविहिन कुशानसम्राट कनिस्काचा पुतळा इ. भग्नमूर्तीचे वर्णनपर तपशील येतात. बुध्दिविहिन पण प्रचंड हत्ती, सरडे यांच्या रक्षण तंत्राचा स्वीकार न केल्यामुळे झालेला नाश आणि दरवर्षी अज्ञानाची अंधकाराची पुटे चढविणारी, वाढविणारी रामटेकवरील त्रिपुरी पौर्णिमेची यात्रा हा सगळा तपशिल अनुषंगिक असून वर्णनात्मक आहे. कवी त्यास

हळूहळू चिंतनशीलतेकडे झुकू लागतो.

भारतभूमीत विखुरलेल्या भग्नमूर्ती म्हणजे संस्कृतीनाशाची प्रतिकेच होत. एकदा संस्कृती पोखरली गेली की राष्ट्रनाश अढळ असतो आणि त्यातूनच,

"हळूहळू मग नाहीसे होते
सामर्थ्य देखील स्वरक्षणाचे
उपेक्षिले जाते सारेच तंत्र
निजरक्षाचे, संघशक्तीचे" (पृ. 39)

याचे कारण बुध्दिसामर्थ्य आणि स्वरक्षणाचे महत्व, अज्ञान स्वार्थ यामुळे समाज लक्षातच घेत नाही आणि त्याचा परिणाम,

"मूठभर मग रानटी लोक
असंस्कृत पण नव्या जोमाचे
चेतलेले साध्या तत्वज्ञानाने
उठतात आणि जिंकतात त्या
जीर्ण राष्ट्राला
मोडतात त्याची मृतसंस्कृती"

अशी ही सांस्कृतिक अवकळा आणि त्यामुळे होणारा परिणाम स्पष्ट करण्यासाठी कवी इतिहासाचा, निसर्गातील अजस्त्र प्राण्यांचा दाखला देऊन आपल्या विचाराला बळकटी आणतात. शिल्पाकृती विषयी मानवाला आस्था, त्या शिल्पाकाराविषयी आदर नाही, त्याची कलाकृती किती थोर आहे याविषयी स्वाभिमान न वाटता लोकांनी तो दगड सोन्याचांदीचे दागिने पॉलीश करण्यासाठी फोडून वापरला आहे अशा या लोकांना भारताचे, या संस्कृतीचे वारसदार कसे म्हणावयाचे ?

राज्ये उद्ध्वस्त होतात, सैन्य रानातून पळ काढते यातही रक्षणतंत्राची उपेक्षा होते. मानवाविरोधी पण अंधश्रध्देने स्वीकारलेले चुकीचे तत्वज्ञान, विभूती पूजा, वर्णविग्रहाचे अनावश्यक स्तोम, निसर्गनियमांचे उल्लंघन अशा कितीतरी गोष्टीमुळे व्यक्तीजीवनाबरोबर समाजजीवनाचा सर्व अंगानी नाश होताना दिसतो आणि त्याचे मूळ कारण "संस्कृति

ऱ्हासातच" आहे असा विचार कवी व्यक्त करतो. धर्मग्लानी, युध्दतृष्णा, मानवामानवात पाडलेले कृत्रिम भेद, त्यामुळे तर समाजजीवनाला अधिकच मरगळ येते.

समाजसंस्कृतीचे रक्षण आणि विकास साधण्यासाठी प्रभावी विचाराची जेवढी गरज असते तेवढीच सांस्कृतिक पुनरूत्थानाच्या ध्येयाची जाणीवही महत्वाची असते हा विचार कदी सातत्याने सांगतो. त्यासाठी ऐहिक जीवन "माया, मिथ्या, भास" म्हणून तुच्छ लेखता कामा नये. या वास्तवात निसर्गसान्निध्यात राहूनच मानवाने विकास साधला पाहिजे हाही विचार कवी दृढ करतो. त्यासाठी निसर्गाच्या उत्पत्ति, स्थिती, लय या त्रिविध रूपांचा मानवाने अभ्यास करून त्यातील मारक शक्तींचा उपयोग आपल्या जीवनासाठी त्यांच्या विकासासाठी करून घेतला पाहिजे. हे सांगताना कवी म्हणतो,

"आणि अशा ह्या निसर्गातच
जगणे आहे मानवप्राण्या
निसर्गानेच परिवेष्टित
जीवन त्याचे
जीवन विकास त्यातच त्याचा
निसर्गातल्या सर्व शक्तींचा
पाहिजे त्याने विचार केला
कारण मानवी जीवन आहे
निसर्गाचाच एक घटक
.... विचारी अंश" (पृ. 54-55)

परंतु मानव निसर्गाच्या सृजन विनाशशक्तींचा विचार न करता घातक अशा भ्रामक मायावादाच्या आहारी जाऊन चुकीचे तत्वज्ञान स्वीकारून स्वतःबरोबर समाजाचेही अधःपतन घडवून आणतो. म्हणून कवी म्हणतो,

"देवावर जरी विश्वास आहे
श्रध्दा आणि निष्ठा
तितकीच ठेवा आपुल्यातहि

कारण देवांचे कार्य
तुमच्या हातेच होणार आहे
तुमच्या रक्षणी त्याचे रक्षण !" (पृ. 60)

परंतु मानव हे कधीच विचारात घेत नाही. त्याचा परिणाम प्रतापगडावरील भवानीच्या अंगावरील अलंकार चोरटयांनी पळविले तेव्हा धार्मिक हेतूने सोमनाथाच्या मूर्ती फोडल्या तेव्हा माणसाला किंवा त्याच्या देवालाही विरोध करणे जमले नाही. हा आपल्या समाजातील देवभोळेपणाचा कळस आहे. त्रिपुरी पौर्णिमेला रामटेकवर भरणाऱ्या यात्रेच्या निमित्ताने हा देवभोळेपणा अधिकच वाढलेला दिसतो.

वास्तविक समाजजीवनात दररोज कितीतरी अत्याधुनिक ज्ञानक्षेत्रे उघडली जात आहेत, परंतु केवळ अज्ञानाच्या, स्वार्थाच्या, जातिधर्माच्या भेदाभेदात सापडलेला मनुष्य हे भग्न समाजमंदिर अधिकच उध्वस्त करीत आहे याची हळहळ कवीला लागलेली आहे.

तरी कवी मात्र आशावादी आहे. ज्या कलाकारांनी हा अमोल ठेवा सांभाळण्यासाठी पुढील पिढीला दिला होता ते दान उपकार समजून त्यांच्या स्फूर्ती जतन करावयास हव्या होत्या पण दुर्दैवाने त्यांचा सांभाळ केला गेला नाही. पूर्वजांनीदेखील त्याची काळजी घेतली नाही मग आताची पिढी तरी काय घेणार आहे असा प्रश्न पडतो.

कवी येथे भावविवश होऊन आपल्या भावसौंदर्यदृष्टिने सांगत आहे की, या सर्वांचा अस्त कधीच झाला आहे. त्या भाग्यशाली रवीने कधीच पश्चिमसागरी बुडी मारली आहे. त्यामुळे जे काही पाण्याचे कण उडाले ते कण आकाशात पसरलेल्या चांदण्याप्रमाणे प्रकाशमान झाले आहेत. त्यांच्यात जे थोडेसे तेज आहे ते तेज या भग्न झालेल्या अवशेषात आहेत त्यांना जपले पाहिजे कारण आता अजूनी उषःकाल होण्यास अवकाश आहे. पारतंत्र्याची अवस्था आता संपली आहे. आता समोर जो उषःकाल होणार आहे त्यात स्वातंत्र्याची भावना लपून राहिली आहे.

रामगिरीवर आजचा सूर्य अस्ताला जात आहे. या सूर्यनारायणाने जगाचा विकास सुरूवातीपासून पाहिला आहे. रामगिरीवर वाकाटक वंशातील राजाची वस्ती होती. त्यांचा वंश येथे वाढला, त्यांचे वैभव या वास्तूशिल्पातून दिसत आहे. कवी येथे भावनाप्रधान

होऊन तेजस्वी सूर्यनारायणाला विनवित आहे की, या मावळत्या सूर्यकिरणांचा मला क्षणभर का होईना आशिर्वाद दे. दिव्यदृष्टि दे की ज्यामुळे मी शांतपणे बसून हे कल्पनाचित्र पाहिन.

सोनेरी किरणामुळे रामलक्ष्मणांच्या मंदिराची शिखरे, भोसले महाल, बाराद्वारीच्या छत्रीचा घुमट ही सर्व रामगिरी सोन्याचा मुलामा दिल्यासारखी दिसत आहे. भग्नमंदिरावरील छतदेखील वाळलेल्या पिवळया गवतामुळे सोन्यासारखे भासत आहे आणि त्याचे चमकणे म्हणजे पूर्ववैभवाचे दर्शन आहे.

मूर्तीवरील जे गूढ हास्य पसरले आहे आणि शांतपणा आहे तो सर्व सृष्टीला अभय देत आहे असे वाटते. येथे भावसौंदर्याची जाणीव होते.

पंचम अवतारामधील जी वामनमूर्ती आहे ती अखंड तांबडया पाषाणात कोरली आहे. तिच्याकडे पाहताना असे वाटते की, नखापासून डोक्यापर्यंत जणू काय वीररस भरला आहे. उभी राहण्याची ऐट, पीळदार बाहू, भरीव व सुंदर छातीवर पसरलेली माळ, विशाल सिंहासारखी भरदार छाती, अष्टभूजा म्हणजे एखाद्या वृक्षाच्या बुंध्यातून पसरतात तशा आठ दिशांना पसरल्या आहेत. उजवा पाय वर उचलला आहे बळी राजाच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळात घालत आहे. तो बळीराजा मोठा दानशूर महापराक्रमी आहे परंतु वाकला, विनम्र झाला आहे. त्याच्या चेहऱ्यावर सत्व पालनाचा शांत आनंद दिसत आहे. रेखीव भुवया, भव्य कपाळ, तेजोमय डोळे चकाकत आहेत असे हे त्रिविक्रमाचे अद्‌भूत दर्शन चराचर व्यापून टाकते.

असे हे रंगरेषा ज्ञान ज्याला आहे त्याला ह्या छिन्नविछिन्न झालेल्या मूर्ती पाहताच डोळयात आसवे निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत. ही एकेक रेषा म्हणजे संवादी, स्थायी, आरोही, अवरोही स्वरविलास आहे, जणू काय भैरव राग द्रुततालांत आळवित आहे असे वाटते.

पण भग्न झालेल्या मूर्तीत देवाचे स्थान राहिले नाही त्यामुळे तेथे पुजारीपण राहिले नाहीत. पण कवी मात्र येथे मनोभावे सद्‌भावनांची पूजा बांधतो, स्वतः नास्तिक असणारा कवी मात्र कलेचा जो प्राण आहे त्याची पूजा बांधून मानवतेचा विकास व्हावा त्या

माणुसकीलाच परमेश्वर मानून त्याची पूजा करतो.

ही भावपूजा करीत असताना निसर्ग साथ करीत आहे. रविराज रोज सूर्यास्तावेळी देवाची आरती करीत आहे. आपल्या सायंतेजाने निरांजन ओवाळीत आहे. मंद वारा झाडांच्या फांद्या हालवून देवाला वारा घालीत आहे. या वसंत ऋतूतला सुगंध आणि झाडांची पाने आरती म्हणून त्या भगवंतचरणी स्वतःला अर्पित करीत आहे. अशी जी ही भावसौंदर्यमाला कवीने गुंफली आहे ती अप्रतिम आहे.

यातूनच पुढे कवी म्हणतो ही आरती आता संपली आहे. सर्वत्र शांतता पसरत आहे. अंधार पसरू लागला आणि कवीच्या मनात निराश विचार निर्माण होऊ लागले. कलाविघातक, अंधश्रध्दाळू, मारक तत्वज्ञानाचा स्वीकार करणारा स्वार्थी समाज आज छिन्नविछिन्न झालेला आहे. त्यात कितीतरी चांगल्या गोष्टी विद्याकला यांचे अवशेष शिल्लक आहेत. परंतु त्याचे महत्व विशद करण्याची त्यात असणाऱ्या संस्कृतीच्या भरण पोषणाची शक्ती ओळखून ती प.टवून देण्याची वेळ आता आली आहे.

"आणि सुटताच झंझावात ती
मेघरूपाने येईल येथे
त्यावर बसुनी
नाचत नर्तनी विद्युल्लतेच्या
करीत गंभीर गर्जना
कोसळले मग जीवनवृष्टी
पुनरूज्जीवन लाभताच ते
तापल्या भूमीत दडलेल्या ह्या
नवबीजांना
फुटणार खास नवअंकुर
समृध्द होईल धरणी पुन्हा
विराजेल येथे नवे, शूर राष्ट्र" (पृ. 72)

अशा या तापल्या भूमीत पुनरूत्थानाला पूरक अशी नवबीजे दडलेली आहेत आणि

झंझावातीची विराट शक्ती येताच सांस्कृतिक पुनरूत्थान सहज घडून येईल. नव्या चैतन्यमय तत्वाच्या स्वीकाराबरोबर त्या संस्कृतीच्या नष्ट झालेल्या उपयुक्त परंपराही पुन्हा उत्पन्न करणे आवश्यक ठरेल. त्या परंपरा अध्यात्मिकज्ञान, समाजकारण, राजकारण संगीत - चित्र - शिल्प - गायन साहित्य इ. कला शोधाव्या लागतील म्हणून अनिल एके ठिकाणी म्हणतात,"शास्त्रे, विद्या, साहित्य आणि कला हे संस्कृतीचे मुख्य आणि महत्वाचे भाग आहेत त्या सर्वांच्या पुनरूत्थानाचा विचार सर्व बाजूनी आज नव्या जाणिवेने व्हावयास पाहिजे." हा विचार अनिलांनी "भग्नमूर्ती" नंतर सात वर्षांनी सांगितला. "भग्नमूर्ती" तील विचारांचाच हा पुनरूच्चार आहे.

अद्यापही त्यांना मानवाच्या स्वार्थांध, अरसिक आणि चुकीच्या तत्वज्ञानाच्या आधीन जाणाऱ्या वृत्तीचे दर्शन घडते त्यामुळे मानव अधिकच दुबळा, चारही बाजूंनी दबलेला, खुजलेला जाणवतो. स्वतःच्या विचार शक्तीला प्राधान्य न देता अंधश्रध्देने, चुकीच्या मार्गाने जाणारा निःसत्ववृत्तीचा आणवतो. अशा माणसाला समाजात कवी या "भग्न वामनमूर्तीच्या प्रतीकातून त्यांच्या अवताराचे रहस्य भग्नमूर्तीच्या आधारे त्या मूर्तीचे भूतकालीन चैतन्यमय स्वरूप आणि आजचे भग्नस्वरूप यांच्या माध्यमातून कवीने भविष्याची आशावादी स्थितीही सूचित केली आहे. राष्ट्रसमाजाच्या अंगाने या काव्यात कवीने चिंतनशीलतेचा प्रवाह अधूनमधून खेळविला आहे.

अनिलांनी आपणास अभिप्रेत असणाऱ्या चिंतनशीलतेला मधूनमधून काव्यात्मतेचीही जोड दिली आहे. काव्यमय सौंदर्याने काव्याचे अंतरंग मधूनमधून रोमहर्षक होते. स्थलकालाच्या कल्पना इंद्रियसंवेद्य होतात त्यामुळे चिंतनशीलता कधी कधी भाववाही होते.

ज्या अज्ञात कलावंतानी रात्रंदिन खपून वामनमूर्तीच्या रूपाने संस्कृतीचे लेणे पुढील पिढयांसाठी दिले त्या भग्नवामनमूर्तीचे हुबेहुब दर्शन कवीने घडविले हे वर आले आहेच. त्यानंतर त्या दिवसाच्या सूर्यास्ताबरोबर कवी वाचकांना कलात्मकतेने भूतकाळात घेऊन जातो. भूतकालीन राजवटीची नामावली संपल्यानंतर त्या भग्नमूर्तीचे मूळचे स्वरूप कवीने वाचकांसमोर उभे केले आहे. त्या भग्नमूर्तीवर संध्यारागाचेस तेज पसरताच मूळची चिरशांतीचे प्रतीक असणारी, चराचराला अभय देणारी मूर्ती कवीला दिसते तेव्हा कवी

म्हणतो,

"ऊन वाऱ्याने सारी हिरवळ वाळून गेली
सुकले वृक्ष
असा आहे जरी आज उन्हाळा
तरी पावसाळा दूर का आहे ?" (पृ. 71)

अशी व्यक्त होते या काव्यपंक्तीतील "तापलेली धरणीमाय" तिचे उलून जाणे "आटलेले जीवनवृक्ष", "वाळलेली हिरवळ", "सुकलेले वृक्ष", "उन्हाळा", "पावसाळा" – या रूपकात्मक शब्दातून कवीने सांस्कृतिक जीवनातील छिन्नविछिन्न भिन्नतेचे स्वरूप अर्थव्यंजकतेने व्यक्त केले आहे.

त्यांच्या रचनेमध्ये श्रेष्ठ अशा अभिजात रचनांचा गुण अनेकार्थ व अनेक अर्थच्छटाबोध हमखास आढळतात.

मानवाजवळ विचार करण्याची पात्रता आहे. महाभारतात कुरूक्षेत्रामध्ये अर्जुन हतबुध्द होऊन युध्दास तयार नव्हता त्यावेळी श्रीकृष्णाने आपले तेजस्वी विचार, तत्वज्ञान सांगितले. गीतेतील कर्मयोगाचा उपदेश ऐकून अर्जुन युध्दास प्रवृत्त झाला व विजय प्राप्त करू शकला. समर्थ रामदासांच्या विचारांचा प्रभाव शिवाजी महाराजांवर पडला असे वैचारिक सामर्थ्य असते.

याच्या उलट जर घडले तर अनर्थ होतो. समाजात भेदाभेद निर्माण होतात व युध्दाला परचक्राला तोंड द्यावे लागते. अशावेळी आपण सारे एकाच मायभूमीचे आहोत हा विचार निर्माण झाला पाहिजे. प्राणपणाने रक्षण करून देश वाचविला पाहिजे.

विनाशकारक विचार रूजले तर त्याचा वटवृक्ष निर्माण होऊन पाळेमुळे, पारंब्या जमिनीत पसरून संस्कृती मंदिरे खिळखिळे करून शिखरापर्यंत उन्मळून पडते काय अशा अवस्थेला आले.

या काळात गौतमबुध्द, महावीर यासारख्या विचारी लोकांची निर्मिती झाली व मानव जातीच्या कल्याणासाठी झटण्याची जिद्द निर्माण झाली.

12854

पण जे धर्म, विचार, तत्वज्ञान आचरणात आणत नाहीत त्यांचा नाश ठरलेलाच असतो. पापपुण्य, धर्म, नीती याच्या पलीकडे जर निसर्ग गेला तर धरणीकंपाच्या सहाय्याने सर्व सृष्टी रसातळाला जाईल मग ते मंदिर असो की, मदिरालय, साधूची झोपडी असो की दुष्टाचे वाडे एकाचवेळी सर्व मोडून पडते.

म्हणूनच कवी येथे वैचारिकतेचे सौंदर्य निर्माण करून त्यातून समाजाला उपदेश करण्याचा प्रयत्न करतो. निसर्गाचे सत्यस्वरूप जाणून उत्पत्ती, स्थिती, लय या रूपांना समजावून घ्या. निसर्ग वेली, फुले, फळ, जीव निर्माण करून समृध्द व सफल बनवतो. आईच्या मायेप्रमाणे निसर्ग या सृष्टीला जपतो. पण तोच जर कोपला तर अक्राळविक्राळ यप धारण करून सृष्टिचा नाश करतो. अशा कालचक्राच्या फेऱ्यात मानवाला जगावयाचे आहे.

आपला विकास करून घ्यावयाचा आहे. ही शिल्पाकृती म्हणजे मानवाचे प्रतिबिंब आहे. ती त्याची प्रतिकृती नव्हे तर प्रतिसृष्टीच आहे. सर्व सौंदर्याचा मनसोक्त आस्वाद घ्यावा, भव्य स्मारके उभी करावीत.

कवीने किती तळमळीने हे विचार मांडलेत. कल्याण करण्याची आशा या जगात सफल होण्यासाठी मानवाने शक्ती सामर्थ्य पणाला लावून प्रयत्न केला पाहिजे त्यातच खरा मानवधर्म श्रेष्ठ आहे.

जर संस्कृतीला शून्य समजून कमीपणा देऊन उपेक्षिले तर या वैभवाला कमनशीबी समजून स्वतःचा भार दुसऱ्यावर घालून बसलो तर आपण विचारभ्रंश होऊ.

स्वप्रचीतीशी प्रामाणिक राहून त्यांनी वेगळया वाटा शोधल्या. भावनाविष्काराला सवंगपणा येत होता त्या काळात अस्सल, उत्कट सूक्ष्म भावनांची "फुलवात" लावली. पुढे भावनेला कणखर वैचारिक चिंतनशीलतेचा कणा देण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या कवितेत समाजाभिमुख वृत्तीतून निर्माण होणाऱ्या जाणीवा आणि आत्ममग्न सौंदर्यवेध अशा दोन प्रवृत्ती दिसतात.

कवीची प्रतिभा सहजतेने भावतरलतेबरोबरच वैचारिकतेचेही उज्ज्वल दर्शन घडविणारी आहे. एकाचवेळी वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा त्यांच्या परस्परानुप्रवेशातून

घडलेले काव्य हा अनिलांच्या प्रतिभेचा विशेष होय. ती भावनांच्या उत्कट आविष्काराबरोबरच वैचारिक गंभीर आशयाची धारणा दर्शविण्यासाठी या खंडकाव्याचेही रूप धारण करते.

दगडांच्या देवमूर्तीत देवत्व आपल्यामुळेच येते ते आपल्याच भावनांचे तेज असते म्हणूनच त्या मूर्तीचे रक्षण केले पाहिजे. परंतु मानव आता रक्षणहीन झाला आहे कारण या निसर्गातील संहारक शक्ती आहेत त्या मानवाला लूटावयास बुभुक्षित नजरेने पाहतात.

आपली संस्कृती उपक्षेमुळे ढासळली आहे. संस्कृतीचे रक्षण करण्याऐवजी संस्कृतीत जाती भेद, पंथ भेद निर्माण झालेत. ऐक्य भावना राहिली नाही. जी एकत्रित येण्याची संघशक्ती होती ती आता नाहीशी होऊ लागली आहे.

ऐक्यभावना जागृत होऊन स्वकीयांविषयी प्रेमभावना निर्माण होण्यासाठी भेदाभेद मोडून काढले पाहिजेत. आपले जीवनक्षेत्र विस्तारित केले पाहिजेत. एकविचार, एकभावना, एक शरीर बनविले पाहिजे. आपली संस्कृती, कला, ऐश्वर्य, मंदीर, देश यांचे रक्षण केले पाहिजे.

ही जी "भग्नमूर्ती" आहे ती हीच भावना सर्वांना दाखवित आहे.

गेलेल्या पिढयांचा आणि आजच्या ज्ञान–विज्ञानाचा संयोग घडवून आणून नव्या पिढीला नवचैतन्य मिळविण्यास तयार केले पाहिजे. आपण लाभलेले भाग्य सार्थकी लावले पाहिजे.

आपल्या पूर्वजांनी निर्मिलेल्या शिल्पाकृती पाहताना अभिमानाने कलासौंदर्याची वाखाणणी करतो व त्यांच्या श्रेष्ठत्वाची जाणीव होते. या जाणीवेतच नवजीवनाची निर्मिती घडण्याची मोठी आशा आहे. कवीने येथे नवे विचार सौंदर्य मांडले आहे. बुध्दीवादी जो अग्नीकुंड आहे त्यात सर्व भेदाभेदांचे अधोगतीचे जीवन "अग्नेयस्वाहा" म्हणून अर्पन करावे.

भग्नमंदिरातील भग्नमूर्ती पाहताना वाटते की, ही जी छोटी खुजटलेली वामनमूर्ती असली तरी देखील त्रिविक्रमरूप धारण करून या कळीकाळाला पाताळात घाला हाच संदेश निसर्गाच्या नाशशक्तींशी झगडताना देतो.

भावगर्भ घटनेभोवती जीवनविषयक चिंतन गुंफलेले दिसून येते. भावनोत्कटता कथा काव्यात महत्वाची मानून भावगर्भ चिंतन साधण्याच्या प्रयत्नातून आधुनिक काळातील खंडकाव्ये विकसित झाली आहेत.

या सबंध काव्यात अशी कल्पनेची भरारी आणि शेवटच्या ओळीतील सूचकता क्वचितच जाणवते. एखादा कलावंत आपली कला पूर्णत्वास नेण्यास पूर्णपणे गढून जातो. आपल्या सर्व भावना, सर्व अंगांनी त्या कलाकृतीत ओतण्याचा प्रयत्न करतो. ती कलाकृती पूर्ण झालीसे त्याला वास्यता वाटते परंतु अंतर्यामी ती कुठेतरी अपूर्ण आहे याची बोचणी त्या कलावंतास लागते. ती बोचणीही कलावंताच्या संवेदनशिलतेने "भग्नमूर्ती" संपविताना,

"झाले पहा आता विणून पुरे
शब्द जाल हे....

असे कवी म्हणतो. भग्नवामनमूर्तीकडे पाहून संस्कृतीनाशाचे स्वरूप कवीला दृगोचर होते. त्याबद्दलची हळहळ आणि संस्कृती संवर्धनाची कळकळही उल्लेखनीय आहे. "भग्नमूर्ती" भोवती कवीने आपल्या विचारभावना गुंफुन काव्यात एकप्रकारचे औदासिनय आणले आहे. एका व्यापक विषयावरील सौम्य स्वरूपाच्या विलापिकेचे स्वरूप या काव्याला आलेले आहे. त्यामुळेच रा.श्री. जोग म्हणतात, "भावनाबरोबर त्यातून उद्भवणाऱ्या विचारांनाही यात महत्व असल्याने विलापिकेचे विचाराचे अंगही त्यात प्रतिबिंबीत झाले आहे. ही विलापिका वाचताना ग्रे कवीच्या विलापिकेची स्मृती होते आणि त्या काव्याचे काव्यत्व ज्यांना पटते त्यांना याचेही महत्व पटल्यावाचून राहणार नाही."

वास्तवतावादी आणि आदर्शलक्षी असलेल्या या काव्यात भावनात्मकता आणि वैचारिकता यांचा अत्यंत हृदयंगम आणि स्फुर्तीदायक संयोग घडून आलेला आहे.

एका खंडकाव्यात निर्जिव वास्तुबद्दल वाटणारी खंत व्यक्त केली आहे तर "निर्वासित चिनी मुलासं" या खंडकाव्यात सजीवाबद्दल वाटणारी कळकळीची भावना व्यक्त केली आहे. या खंडकाव्यात अनिलांच्या काव्यशक्तीचा याहून रमणिय विलास पहावयास मिळतो. "भग्नमूर्तीत" मांडलेला आदर्श हा राष्ट्रीय संस्कृतीचा पुनः संस्थापनाचा आहे. तर या काव्याची भूमिका अधिक व्यापक म्हणजे शुध्द आंतरराष्ट्रीय

स्वरूपाची व मानवहितवादी आहे. "चिनी बालका" च्या रूपाने प्रकट झालेली "पराकाष्ठेची असहाय्यता" पाहून कवीचे हळुवार मन कंपीत झाले व संतप्तही झाले.

"निर्वासित चिनी मुलास" या काव्याची अंतर्गत भूमिकाच संतप्त होण्यासारखी आहे कारण चीन देशावर साम्राज्यवादी जपानने दुसऱ्या महायुध्दात केलेले आक्रमण हे कोरिया हस्तगत करण्यासाठी होते. पाश्चात्य राष्ट्रांनी दुर्बल चीनचे लचके तोडण्यास प्रारंभ केला. युध्दामुळे चीनची आर्थिक घडी विस्कटली त्यामुळे त्याला जपानचे कर्ज घ्यावे लागले.

गरीब लोक दुष्काळाने पिडित झालेले, नद्यांना येणाऱ्या महापुराने मुंग्यासारखे लोक मरत होते. मजुरांना योग्य मजुरी मिळत नव्हती. अशा परिस्थितीत कम्युनिस्टांनी फायदा उठविला.

रशियात जाऊन कडवे कम्युनिस्ट झालेले चीनी तरूण अनेक खेडयात जाऊन गोरगरीबांसाठी कामे करत होती. लाखो लोक कम्युनिस्टांच्या लाल निशानाखाली एकत्र येऊ लागली. दळणवळणाची साधने तयार केली. पोस्ट, तारायंत्रे, शाळा, रूग्णालये बांधली. 1931 पर्यंत चीनचा सुमारे एक अष्टांश भाग परत कम्युनिस्ट वर्चस्वाखाली आला.

1937 मध्ये जपानच्या आक्रमणाची लाट वेगाने आली. नानकिंग हे राजधानीचे शहर जिंकून तेथील लोकांवर जपान्यांनी अत्याचार केले. दुसऱ्या महायुध्दामुळे जीवितहानी व वित्तहानी किती झाली याचा अंदाज करणे अशक्य आहे. रणगाडयांचे युध्द म्हणून ओळखले जाते. संहारक शस्त्रास्त्रे वापरली गेली त्यावेळी सर्वच राष्ट्राने माणुसकीची कोणतीही चाड बाळगली नाही. त्यांनी केलेल्या संहाराला जगाच्या इतिहासात तोड नाही.

तो संहार भीषण होता. देवालये, इमारती, अमीर–उमरावांचे महाल, गोरगरीबांच्या झोपडया, शाळा–कारखाने, वस्तुसंग्रहालये, प्राणीसंग्रहालये यापैकी काहीही या हल्ल्यातून सुटले नाही. अफाट मनुष्यहानी व वित्तहानी झाली. लाखो निरपराध लोक संहारात बळी पडले. त्यातील हे एक लपून बसलेले, वाचलेले "चिनी बालक" त्याला उद्देशून त्याला धीर देत कवीने भावनाविवश होऊन हे काव्यसौंदर्य निर्माण केले आहे. या महायुध्दाने सामाजिक व आर्थिक क्षेत्रात खूप उलथापालथ घडवून आणली. समाजजीवन विस्कळीत

होऊन सामाजिक मूल्ये ढासळली. चलनफुगवटा, महागाई यांनी सर्व जगभर थैमान घातले.

नव्या भयानक संहारक शस्त्रास्त्रांमुळे व आधुनिक युध्दतंत्रांमुळे कल्पनातित विनाशकारी ठरले. याचा सर्व परिणाम जगातील अनेक राष्ट्रांवर, माणसांवर झाला.

कवीला हे उत्कट दारूण दुःख पाहून त्या बालकाचे चित्र पाहून त्यांच्या मनात प्रक्षोभ निर्माण झाला. जगात स्थिर शांतता नांदावी यासाठी परस्परांत सहकार्य, सहजीवन हवे. आपआपसातील मतभेद व संघर्ष युध्दाचा अवलंब न करता परस्पर सहकार्याने विचार करून सोडविले पाहिजेत असा बोध कवीने आपल्या या काव्यात सांगितला आहे.

या काव्यातील विचारसौंदर्य प्रत्येकाला जाणवते. आपण काहीतरी चांगले कृत्य करावे. शांतताप्रिय असा भारत देश आहे. सहकार्याची भूमिका भारताची आहे म्हणूनच कवीने या बालकाला उद्याचा आशावाद दाखविला आहे.

जगातील प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष युध्दामध्ये गुंतला होता. "हा संहार अखेर आहे तरी कशासाठी ?" असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. त्याचे कारण म्हणजे जगातील हुकुमशाहीचा शेवट करून सर्वत्र लोकशाही स्थापन व्हावी यासाठी हे युध्द.

जपान हे प्रगतीमुळे कारखानदारीत पुढे होते. पण कारखान्याकरिता कच्चा माल मिळविण्यासाठी वसाहती व पक्का माल विकण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळविण्याची गरज जपानला वाटू लागली होती. जवळच प्रचंड अविकसित चीनचे साम्राज्य होते. 1936 डिसेंबर मध्ये चँगला काही राष्ट्रवाद्यांनी पकडले व नानकिंग हे राजधानीचे शहर जिंकून तेथील लोकांवर जपान्यांनी अत्याचार केले. हे अत्याचार कोमल मनाच्या कवी अनिलांना अस्वस्थ करणारे ठरले. मानवतावादी असणारे अनिल त्यांच्या कवितेने दोन महायुध्दे पाहिली आहेत. या महायुध्दाचे संस्कार व परिणाम भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला होरपळून टाकणारे होते. 1920 पर्यंत तरूणांना जागृत करणारे टिळक, आगरकर यांचे वैचारिक युग संपले होते. त्याचबरोबर गांधींचे नवे अहिंसा क्रांतीपर्व सुरू झाले होते. कम्युनिझमचा प्रचार व प्रसारही मोठया प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचला होता. यातील चैतन्यांच्या प्रेरणांचा लाभ कवि अनिलांना घडलेला आहे.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असल्याने समाजातील आघात प्रत्याघातांचा विचार त्याला अपरिहार्य आहे. अनिलांनाही तो तसाच अपरिहार्य वाटला म्हणूनच अनिलांचा मानवतावाद त्यांच्या काव्यात सहजपणे आलेला आहे.

क्रांतीच्या आशावादाचे गाणे गाणारा हा शाहीर आणि रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल असे आशावादाचे स्वप्न गाणारा कवी कुसुमाग्रज यांच्या विचारशलाका परस्परांशी अगदी मिळत्याजुळत्या आहेत. स्वातंत्र्य – समता – बंधुता यांच्या गोष्टी आजवर फक्त ऐकतच आलो. पण या नव्या जगात सर्व गोष्टींना अर्थ प्राप्त होणार आहे असे कवी सांगतो. या नव्या जगात,

न होतील मानव धनी
अथवा दास मानवांचेच

अशी समाजव्यवस्था असेल अशी आशा कवी व्यक्त करतो. चिनी बालकाला ते दिलासा देत आहेत.

शांतताप्रिय असणाऱ्या या भारतभूमीत अनेक थोर संत, विद्वान, साहित्यीक होऊन गेले. ज्ञानेश्वरांच्या विचारांचा पगडा कवी अनिलांवर होता त्यामुळेच त्यांनाही अवघ्या विश्वाची काळजी वाटते. केवळ स्वतःचा, राष्ट्राचा विचार न करता विश्वाचा विचार त्यांनी आपल्या प्रतिभासामर्थ्याने या बालकाच्या दुःखाबद्दल व्यक्त केला आहे.

तसे कवी अनिल वृत्तीने पुरोगामि आहेत पण त्यांच्या व्यक्तीमत्वात जुन्या नव्यांचा सुंदर मेळ जमला आहे. ते अंधश्रध्दाळू नाहीत तरी त्यांच्या मनाची बैठक श्रध्दावादी आहे. मानवी संस्कृती विविधात्मकता व मानवता या गोष्टीवर त्यांची श्रध्दा आहे. जीवनाच्या विविध अंगाकडे ते कमालीच्या डोळस वृत्तीने पाहतात.

त्यांच्या मानवतावादी कवितातील अथांगतेला तर मराठी काव्यात तोड नाही. अनिलांचा उत्तुंग. ध्येयवाद आणि विश्वमानवासाठी तिळतिळ तुटणारे मन प्रत्येक ओळीओळीतून प्रकट होते. अन्यायाचे प्रतिकार करणारे मन विलक्षण उफाळीतून व्यक्त होते. समाजातील दैन्याचे, गुलामगिरीचे वास्तवचित्रण रेखाटताना त्यांची निरिक्षण शक्ती आणि वैचारिक सामर्थ्य व्यक्त होते. गुलामी झोटींगशाहीचे स्वार्थी, पाशवी, अत्याचारी व

ढोंगी असे वास्तवचित्र रेखाटून कवीने कृत्रिम दयेचा त्यांचा बुरखा फाडून टाकला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कवितात उध्वस्त मानवी जीवन जसे खेद निर्माण करते तसाच खेद किंबहुना त्यातूनही तिव्र विखार स्वातंत्र्यानंतर काळातील सामाजिक कवितात व्यक्त होतो. नैराश्येच्या गर्द छायेतून आशेच्या संजीवनाकडे नेणारी अशी ही काव्य विचार शलाका आहे.

विचारशृंखलेतूनच या खंडकाव्याचे भावाशय व वैचारिक सौंदर्य उमलत राहते. "चिनी बालक" हे प्रतीक आहे. त्याच्या चेहऱ्यावरील हावभावांचे सूक्ष्म निरिक्षण म्हणजे हे खंडकाव्य आहे. त्याच्याबद्दल वाटणारी आस्था कवीने यात गुंफली आहे.

चिनी बालकाच्या दारूण दुःखाबद्दल त्यांना सहानुभाव वाटला. ते दुःख उत्पन्न करणाऱ्या समाजरचनेबद्दल त्यांच्या मनात प्रक्षोभ उत्पन्न झाला. त्या बालकासारख्या निरपराध जीवांचा निर्दय छळ करणाऱ्या या "जीर्ण जगाचा" "अमानुष संस्कृतीचा" निःशेष अंत होवो अशी अपेक्षा कवीने व्यक्त केली आहे.

नव्या समाजवादी विश्वाच्या अभ्युदयाचे सूतोवाच केले आहे. यातील मानव्याचा उमाळा व अभिजात कलेची जातीवंत रसिकता व आस्था कौतुकास्पद आहे.

कवी या खंडकाव्यात अतिशय भावनावश झाला आहे. तो म्हणतो तुझी भेदरलेली नजर, अश्रूंनी भरलेले डोळे, आई, बाबा, दादा, ताई असे म्हणून हाक मारण्यासाठी उघडलेल्या तोंडातून दुधाचे दात दिसत आहेत. त्यांच्याकडे धाव घेण्यासाठी व ते न दिसल्यामुळे धरणीवर अंग टाकून धाय मोकलून रडत आहे हे चित्रण म्हणजे दगडाच्या हृदयालाही पाझर फुटणारे आहे.

ती धरणीमाता देखील त्याला पोटाशी धरू शकत नाही. कारण तीच दुसऱ्याच्या ताब्यात आहे. हे सैनिक शत्रू राष्ट्राचे आहेत ते लोकांना वधस्तंभाकडे घेऊन जात आहेत ते तुलादेखील नेतील, तोपर्यंतच तू येथून पळ काढ. कवीत्वाला युध्दाची स्थिती काय झाली आहे ते सांगतो तू तुझ्या आईवडीलांना दोष देऊ नकोस. तुझ्या राष्ट्रावर ज्यांनी तोफगोळयांचा वर्षाव केला त्यांचा संहार करण्यासाठी ते शस्त्र हातात घेऊन त्यांच्याशी निकराने लढत आहेत पण दैवगती फिरली की सर्व काही फिरते.

कवीने येथे त्या बालकाचे मनोधैर्य सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे. कवीने युध्दात ज्या घटना घडल्या त्या वर्णन केल्या आहेत. त्याचे वडील शत्रूच्या गोळीला बळी पडले व त्याची आई युध्दात घायाळ झालेल्यांना मदत करीत असताना भरधाव येणारा रणगाडा तिच्या अंगावरून गेला. तिला तिची मुलदेखील पाहता आली नाहीत.

युध्दामुळे कुटुंब कशी उध्वस्त होतात ते वर्णन केले आहे. या जगाच्या भेसूर आकांक्षाची कृत्रिम उपासमार चालविली जात आहे. स्वार्थी भांडवलदार या विषम समाजरचनेत मानवी प्राणाच्या मोलापेक्षाही अधिक मोल देऊन किटकजन्य मोती विकत घेतात आणि श्रमजीवी जीवांचे घामाचे बिंदू मातीमोल ठरतात. वास्तवाच्या ध्यासातून अभिलाषेतून निर्माण होणारी ही भेसूर युध्दे जेत्यांना आणि पराजितांना दोघांनाही नेस्तनाबूत करतात. हे महायुध्दामागचे कटू सत्य कवीने सांगितले आहे. आसन्नमरण झालेल्या या जीर्ण जगाचा अंत करण्यासाठी कवी उत्सुक आहे पण त्या अधीरतेतही या सरणाने सारेच अवशेष नष्ट होणार आहेत का ? ही गोष्ट कवीला अस्वस्थ करते पण या विचाराबरोबरच मनातला आशावाद उफाळून येतो आणि मग ते प्रसन्न होऊन म्हणतात –

त्या जीर्ण जगाच्या चितेतूनच
उठणार आहे अमरपक्षी
नव्या स्थितीच्या नव्या व्यवस्थेचा
नव आदेशाचा नवाकांक्षाचा

नव्या जगात अशी समाजव्यवस्था असेल की आजवर संहाराच्या अस्त्रांचा शोध घेणारी विध्वंसकवृत्ती यापुढे मानवहितासाठी समाहाराचा नवा संसार उभा करील आणि मग या नव्या संसारात नव्या पिढीचा योगय सांभाळ होणार आहे. त्या चिनी मुलाला कवी नवी उमेद देतो.

धीर धर थोडा
घेणारच आहे तुला ते पोटी
तूच त्यांची शक्ती
आणि उमाळा...
तुझ्याचसाठी

या नव्या जगामुळे तुझे म्लान झालेले डोळे दिपून जातील म्हणून कवी त्याला अश्रू पुसण्यास सांगतो पण केवळ अश्रू पुसून चालणार नाही हेही कवीला जाणवते कारण आपल्या आसुरी कर्माची फळे या जीर्ण जगाने पहायलाच हवीत नाहीतर या अश्रूबरोबर त्या व्यथा वेदनांची जाणही बुजेल. कवीच्या भावसौंदर्यातून वात्सल्याचा जणू एक मंगल स्त्रोत स्त्रवताना दिसतो ही वात्सल्याची भावना विश्वव्यापी आहे.

दुसऱ्या महायुध्दात माणुसकीला लाज आणणारी दृश्ये हृदयाचा ठाव घेतात. त्याची ताई की जिने नुकतेच यौवनात पदार्पण केले होते तिला त्यांनी ओढून नेले त्यावेळी त्याच्यापेक्षा मोठा असणारा भाऊ त्याचे रक्त उसळले आणि तो त्या सैनिकांवर धाऊन जाऊन म्हणाला, "खबरदार, जर माझ्या ताईच्या अंगाला हात लावला तर" पण त्या मुर्दाड शिपायांना काहीच वाटले नाही उलट दात विचकीत त्या दोघांना कुठे तरी अज्ञात स्थळी ओढत फरफटत नेले. अशी वासनेने बरबटलेली पशूसारखी असणारी माणसं. माणसं नव्हेत, हिंस्त्र नरपशू होत.

कवीने येथे पशूत्वाचा धिक्कार केला आहे. त्या मुलाची जी केविलवाणी अवस्था झाली आहे याचे वर्णन वाचताना मन हेलावून जाते. तेथेच त्यांचे भावसौंदर्य जाणवते. त्यातून कवीने त्याला विश्वास निर्माण व्हावा म्हणून अनेक विचार सांगितले आहेत. कवीने त्याला तू दोष कोणाला देणार ? तुझ्यासारख्या बालकांचे घोर अपराधी कोण आहेत हे कसे कळणार ? जे अपराधी आहेत ते ऐषआरामात तूपपोळी खात गाद्यांवर लोळत पडले आहेत. ज्यांनी देशाची होळी पेटवून दिली आहे. शत्रूला लागणारी सर्व युध्दसामग्री विकून स्वतःला धन मिळविले आहे त्या नराधमांना तू दोष दे.

जगातील लोकांची असणारी प्रवृत्ती किती वाईट आहे ती सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची वैचारिकता व त्यातून स्पष्टपणे जाणवणारा भावना उद्वेग दिसून येतो.

जे केवळ शांतीपाठ निर्लज्जपणे घोकत आहेत. राष्ट्रात एकात्मता नांदावी असे पोकळपणे म्हणत स्वतःचा स्वार्थ साधत आहेत. गरीबांवर कर बसवून स्वतःचा रंगेलपणा वाढविला आहे. सिंहासन मिळावे म्हणून शत्रूशी हातमिळवणी करणारे खूपच आहेत.

म्हणजेच प्रत्येकाला स्वतःच्या प्रतिष्ठेची स्वामित्वाची हाव आहे त्यातून त्यांची

हिणकस वृत्ती दिसून येते. शत्रूच्या कृपाप्रसादाने मिळणारे मायभूमीचे खंड त्यांच्या समोर टाकले तर ते कुत्रा जसे हडके चघळतो व समाधान पावतो त्याप्रमाणे राजे लोक मानतात त्यांना तू दोष दे.

साम्राज्यशाहीत असणाऱ्या सरंजामीवृत्तीच्या लोकांना कुत्र्याची उपमा दिली आहे.

कवी म्हणतो आम्ही शेजारी आहोत. चाळीस कोटी असूनदेखील आम्ही परिस्थितीचे दास झालो आहोत. आमच्या हृदयाचा पर्वत हिमालयाहून थंड बनला आहे. तुझ्या देशातील आगेची आच अजूनी आम्हाला लागली नाही जी माणसाची प्रवृत्ती गंगा आहे ती गारठलेली आहे. भगीरथ अजूनी निर्माण झाला नाही. या जीर्ण जगात कित्येक माणसे रहात आहेत. ती पृथ्वीच्या पाठीवर जागा असतानादेखील दुसऱ्याच्या जागेसाठी भांडत एकमेकांस लढाया करीत आहेत.

माणूस स्वार्थाने किती आंधळा झाला आहे ते दिसून येते. जे उन्मत्त आहेत त्यांच्या हातात सत्ता आहे. ज्यांची अक्कल गहाण टाकली जाते जे वास्तव आहे त्याला किंमत न देता अवास्तवाच्या पाठीमागे लागून युध्दात विजयी व पराजयी दोघांनाही मरावे लागते तर या सर्व जगाचा संस्कृतीचा एकदा अंत होऊ दे असे कवी निराशेने म्हणतो कारण तो अंत झाला तरी काही वाटणार नाही. आता त्यांच्या चितेसाठी लाकडं गोळा करावयाची व चिता पेटवायची. आता एकच वाटते की, हे युध्द शेवटचेच ठरावे त्यातील धडपड संपावी यातून कोणीही वाचू नये.

पण त्यातूनच उद्याचा आशावाद सांगितला आहे. या चितेतूनच अमरपक्षी आता उड्डाण करणार आहे जो उद्याच्या जगात भरारी मारण्यासाठी नव व्यवस्थेचा व नवआकांक्षा घेऊन स्वतःचा पक्ष तयार करील.

युध्दाच्या सुरूवातीचा व मध्यकाळातील दुबळया शांतीचा आवाज घुमवून आपल्या पंजामध्येय पकडून तो अंतराळात प्रबलशक्तीने भिरकावणारा नव्या जगाचा शांती भिरूंड आहे.

अनिलांनी नव्या समाजवादी विश्वाच्या अभ्युदयाचे सूतोवाच केले आहे.

नवे जग ते
जगणार आहे जन्मून आता
स्वातंत्र्य – समता – बंधुत्वाच्या ते

जे नवे जग निर्माण होईल ते समतेच्या आधारावर व वास्तवात एकमेकात असणाऱ्या बंधुभावावर निर्माण होऊन मानवतेने जगणारी पिढी तयार होईल. जे काही या सृष्टित आहे ते सर्वांचे आहे ही समभावना त्यांच्यात जागृत होईल. शेवटी कष्टाचे फळ मिळेल.

नव्या जगाची कल्पनादेखील कवीने मांडली आहे. ते जग असे असेल की त्यात एकटाच मालक असणार नाही किंवा कोणीस कुणाचे दास असणार नाहीत. सर्वजण समानतेने सहकार्याने वागतील. सार्वजनिक श्रम करून कार्य करतील. पराक्रमाला नवा वाव मिळेल. मानवाला चीनची भिंत बांधण्यास सहाय्य होईल. संहार होण्याची भिती आता राहणार नाही. मानवहिताचा विचार आता मानवाची बुध्दी करेल.

असे हे विचारधन कवीने अतिशय भावविव्हल होऊन मांडले आहेत. विचारदृष्टया वैशिष्टयपूर्ण चिंतनिका आहेत हे स्पष्ट होते. त्यातील मानव्याचा उमाळा व अभिजात कलेची जातीवंत रसिकता व आस्था कौतुकास्पद व स्वागतार्ह आहे.

सौम्य भावनेचा हा ओलावा वाचकांना विचार प्रतिपादनात्मक दीर्घकाव्यांच्या सुरूवातीला जाणवतो.

नवे जग तुझ्या हाकेला ओ देऊन धावत येणार आहे, तुझा सांभाळ करणार आहे. तू थोडा धीर धर. अनिलांनी आधुनिक जीवनोपयोगी तत्वज्ञान आत्मनिष्ठ भूमिकेवरून व्यक्त केले आहे. विचारास भावनेचे अंकुर फोडून त्यास कर्मप्रवण करणारे असे उपयोगी तत्वज्ञान काव्यातून सांगितले आहे. खंडकाव्यातील भावना रसिकांच्या मनात भावजागृती करतात.

यातील लहान मुलाच्या मनाच्या विविध उत्कट विकारावस्थांचा अविष्कार आहे. या काव्यात भावनेच्या उत्कटतेला वाव आहे त्याचबरोबर त्यांचा बोध या चिंतनिकात उतरला आहे.

साम्राज्यवादी राष्ट्रे त्यांच्या आसुरी महत्वाकांक्षा या किती निर्दय आणि निर्घृण असतात याची प्रचीती हे काव्य वाचताना येते. नव्या उमेदीची पिढीच्या पिढी बेचिराख झाली होती. पुन्हा शून्यातून सारे उभारावयाचे होते अशा स्थितीत देशोधडीला लागलेले हे चिनी बालक कवीला अस्वस्थ करते. दगडमातीच्या कलेत कोरलेली संस्कृती उध्वस्त झाली म्हणून खंतावणारा कवी हे जिवंत आणि जातीवंत उध्वस्त चित्र पाहून जे प्रक्षोभपूर्ण भावप्रकटीकरण करतो ते निःसंशय अव्वल दर्जाचे आहे. अन्यायाच्या प्रतिकाराची तीव्र इच्छा आणि सदाचाराचे मांगल्य या पात्रावर कवीचा आशावाद स्थिर झालेला आहे. अनिलांची ही दीर्घ कविता म्हणजे त्यांच्या "काळाचे गाणे" आहे. या काव्यात कोठेही अभिनिवेष दिसून येत नाही व प्रचारकी थाटही जाणवत नाही. येथे जे प्रकट झाले आहे ते अस्सल, निर्मळ, उत्कट भावचेतन आहे.

अशा विचार सौंदर्याने व भावसौंदर्याने त्यांची दोन्ही खंडकाव्ये सुशोभित झाली आहेत त्याचप्रमाणे पुढील प्रकरणात वाङ्मयीन सौंदर्यस्थळांचा विचार करावयाचा आहे.

* * * * *